
Pandit Deendayal Upadhyay Education Society's

# SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAY,

## PHULAMBRI DIST. AURANGABAD

Affiliated to

DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, AURANGABAD



# DEPARTMENT OF HISTORY




## 2016-17

www.savtacollege.org
vijaypande77@gmail.com

02402633988
9422723277

## Teaching Faculty



**Mr. Vijay Ramrao Pande**
M.A., M.Phil., SET.
Head & Associate Professor
Date of Joining: 20 Oct 2001



Prof. Sunil Sampatrao Pande
M.A., B. Ed., SET
Assistant Professor (CHB)
Date of Joining: 7 July 2016 to 28 Feb 2017

### अभ्यासक्रम फलकावर लावणे :-

दि. 16 जुन 2016 रोजी प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राचे इतिहास विषयाचे अभ्यासक्रम सूचना फलकावर इतिहास विभागामध्ये लावण्यात आले.

### वेळापत्रक :-

दि. 20 जून 2016 रोजी प्रथम व द्वितीय सत्राचे वेळापत्रक विभागात लावण्यात आले. तसेच 21 जून रोजी विभाग, विभागप्रमुख व सहाय्यक यांच्या वेळापत्रकाच्या प्रती तयार करुन त्या विभागाच्या फाईलला लावण्यात आल्या तयेच महाविद्यालयाच्या वेळापत्रक फाईलला लावण्यात आल्या.

### वार्षिक नियोजन :-

इतिहास विभागातर्फे घेण्यात येणा-या कार्यक्रम उपक्रमाचे वेळापत्रक मे 2016 मध्ये तयार करण्यात आले. तर विषयाच्या अभ्यायक्रमाचे वार्षिक नियोजन 16 व 17जुन 2016 रोजी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे तयार करण्यात आले.

## तासिका तत्वावरील पदासाठी मुलाखती :-

महाविद्यालयातील इतिहास विभागाचे दुसरे पद पुर्णवेळ नसल्याकारणाने दि. 27/6/2016 रोजी मुलाखती घेऊन भरण्यात आले. सदरील जागेवर प्रा. सुनिल संपतराव पांडे यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रा. विजय पांडे हे विषयतज्ज्ञ म्हणून तसेच प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

## कार्यभारः

| No. | Name of Assist. Prof. | Papers | Work Load | TOTAL |
|---|---|---|---|---|
| 1 | PANDE VIJAY RAMRAO | 6 | 24 | 32 |
| 2 | PANDE SUNIL SAMPATRAO | 2 | 8 | |

## प्रवेश : 2016-17

- **लिंगनिहाय प्रवेश**

| Class | Male | Female | Total |
|---|---|---|---|
| BAFY | 30 | 21 | **51** |
| BASY | 17 | 19 | **36** |
| BATY (SUB) | 20 | 21 | **41** |
| BATY (MAIN) | 06 | 03 | **09** |

- **प्रजातीनिहाय प्रवेश**

| CLASS | SC | ST | OBC | NT | MINORITY | GEN | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| BAFY | 08 | 00 | 13 | 10 | 00 | 20 | **51** |
| BASY | 01 | 01 | 06 | 07 | 00 | 21 | **36** |
| BATY (Sub) | 07 | 00 | 08 | 08 | 00 | 18 | **41** |
| BATY (Main) | 01 | 00 | 01 | 02 | 00 | 05 | **09** |

## अभ्यासपत्रिका विभागणी : 2016-17


| | Prof. Pande V. R. (Head) |
|---|---|
| Paper I | Shivaji and his times (AD 1630- AD 1707) |
| Paper III | History of Maratha- (1707-1818) |
| Paper VI | History of Delhi Sultanate (A.D.1200-A.D.1526) |
| Paper VIII | History of Mughal India (A.D.1526-A.D.1707) |
| Paper IX | Historiography |
| Paper X | History of Indian National Movement (A.D.1885-A.D.1947 |
| Paper XI | History of Modern China (A.D. 1900 – A.D. 1950) |
| Paper XII | Project work |

| | |
|---|---|
| **Paper XIII** | Fields of History (Archaeology, Museology and Tourism) |
| **Paper XIV** | Landmarks in the History of Modern World |
| **Paper XV** | Nationalist movements in south - East – Asia |
| **Paper XVI** | Project work |

| | **Prof. Pande S. S.** |
|---|---|
| **Paper II** | History of Modern Maharashtra-(AD1818-AD1905) |
| **Paper IV** | Twentieth Century Maharashtra.( 1905-1960) |
| **Paper V** | History of India (Up to -BC 300) |
| **Paper VII** | History of India (BC 300- AD 650) |

## नॅक समितीची भेट

महाविद्यालयाचे नॅक या कार्यालयाकडून मुल्यांकन व मुल्यमापन करुन घेण्यासाठी महाविद्यालयात दि. ०७ ते १० ऑगस्ट २०१६ या दरम्यान नॅक समितीने भेट दिली.समितीसमोर दि. ७ ऑगस्ट रोजी विभागाचे सादरीकरण प्रा. विजय पांडे व प्रा. सुनिल पांडे यांनी केले. दि. ८ ऑगस्ट रोजी समितीच्या सदस्यांनी विभागास भेट देऊन फाईल, निकाल, पुस्तके यांची पाहणी केली. तसेच प्रश्नोत्तरेही केली.



## हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन

दि. 17 सप्टेंबर 2016 रोजी हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्ताने महाविद्यालयात सकाळी 09.00 वाजता हैदराबाद मुक्तिसंगामाचे वेगळेपण याविषयावर प्रा. बालासाहेब टेकाळे, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद ़यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामावर प्रकाश टाकून भारतीय स्वातंत्र्य कसे पूर्ण झाले याचा आढावा घेतला. तसेच मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिकांवरही प्रकाश टाकला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. एस. आर. टकले हे होते. प्रास्ताविक प्रा. विजय पांडे यांनी तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सुनिल पांडे यांनी केले.




**हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनः** व्याख्यान




## 1.अतिथी व्याख्यान

इतिहास विभागाच्या वतीने प्रथम सत्रात दिनांक २७ सप्टेंबर २०१६ रोजी प्रा. डॉ. राजेश करपे, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.




## 2.अतिथी व्याख्यान

इतिहास विभागाच्या वतीने प्रथम सत्रात दिनांक ३० जानेवारी २०१७ रोजी प्रा. डॉ. टी. आर. पाटील यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.



# छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव २०१७

छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव 2017 च्या निमित्ताने इतिहास विभागाच्या वतीने दिनांक 19 फेब्रुवारी 2017, रविवार रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिवादन केले.

दिनांक 20 फेब्रुवारी 2017, सोमवार रोजी इतिहास विभागाच्या वतीने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात तालुक्यातील शाळा-महाविद्यालयातील एकुण 40 विद्यार्थी-विद्यार्थीनींनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेत श्री संत सावता गुरुकुल फुलंब्री येथील ऋषिकेश गायकवाड या विद्यार्थ्यांने 701 रुपये रोख व प्रमाणपत्रासह प्रथम क्रमांक, पाथ्रीकर महाविद्यालय पाथ्री येथील गाडेकर योगेश उत्तम याने 501 रुपये रोख व प्रमाणपत्रासह द्वितीय क्रमांक, सरस्वती विद्यालय, वढोदबाजार येथील तुपे जयश्री गजानन हिने 201 रुपये रोख व प्रमाणपत्रासह तृतीय क्रमांक संपादन केला, तर खंडागळे रितेश तुपे मनिषा रमेश यांनी उत्तेजनार्थ बक्षीसे मिळाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विजय पांडे यांनी, सुत्रसंचलन प्रा. सुनिल पांडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले. परिक्षक म्हणून डॉ. संजीवकुमार पांचाळ व डॉ. महेश थोरात यांनी जबाबदारी पार पाडली. बक्षीस वितरण प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, रामकोर एस. टी. यांच्या हस्ते झाले.




Chhatrapati Shivaji Maharaj Birth Anniversary Taluka level oratory Competition- Third prize winner




Chhatrapati Shivaji Maharaj Birth Anniversary- Taluka level oratory Competition

Second prize winner




Chhatrapati Shivaji Maharaj Birth Anniversary Taluka level oratory Competition-First prize winner




Chhatrapati Shivaji Maharaj Birth Anniversary Taluka level oratory Competition -Participants

## दृकश्राव्य माध्यम

दि. २० सप्टेंबर २०१६ रोजी बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील शिवछत्रपती या मालिकेच प्रसारण दाखवण्यात आले. तसेच प्रत्येक पेपरची एक तासिका पीपीटीद्वारे घेण्यात आली.






### भित्तीपत्रके

दि. २७ सप्टेंबर २०१६ रोजी होमरूळ चळवळ या विषयावर तर दि. ३० जानेवारी २०१७ रोजी गांधीजी अहिंसा व सत्याग्रह या विषयावर भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

### गटचर्चा

बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ८ ऑक्टोबर २०१६ रोजी गटचर्चेचे आयोजन केले होते.

### सेमिनार

बी. ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि. ८ ऑक्टोबर २०१६ रोजी सेमिनारचे सादरीकरण केले.

### प्रकल्प सादरीकरण

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण विद्यापीठाचे बहिस्थ प्राध्यापक प्रा. केशव लहाने, राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री, यांच्या मार्गदर्शनाखाली १० मार्च २०१७ रोजी घेण्यात आले.

### नाणी संग्रह

श्री कचरू गरसोळे या इतिहास विभागाच्या माजी विद्यार्थ्याने इतिहास विभागास चार नाणी भेट दिली.

### ज्ञानस्त्रोत केंद्रात इतिहासाची पुस्तके खरेदी

२०१६-१७ या वर्षात ज्ञानस्त्रोत केंद्रात इतिहास विषयाची . . . . पुस्तके खरेदी करण्यात आली.

## शैक्षणिक सहल

महाविद्यालयाची शैक्षणिक सहल दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी जळगाव येथील अहिंसा तिर्थ, जैनहिल येथे काढण्यात आली होती. सहलीत १७ विद्यार्थीनी व १५ विद्यार्थी असे ३१ विद्यार्थी सहभागी झाले होते..

## विभाग प्रसिद्धी


अमृतमहोत्सवी
पुढारी
स्थापना १९३९
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
औरंगाबाद
मंगळवार । दि. २१ फेब्रुवारी २०१७ । वर्ष १, अंक ४६ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक

फुलंब्री : संत सावता माळी महाविद्यालयात महाराजांना अभिवादन करताना.

शिवजयंती उत्साहात


दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव नि:पक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+६+८=२६ । किंमत ₹ ४.०० | वर्ष ६ । अंक २६५ । महानगर
औरंगाबाद मंगळवार, २१ फेब्रुवारी २०१७

फुलंब्रीत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वाटप केले.

**फुलंब्री तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ऋषिकेश गायकवाड प्रथम**

शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून फुलंब्रीतील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. यात ४० स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर अतिशय परखड व सुंदर अशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी आपापली मते मांडली. यात प्रथम : ऋषिकेश गायकवाड (श्री संत सावता गुरुकुल) यास ७०९ रुपये व प्रमाणपत्र, तर द्वितीय : योगेश गाडेकर (राजश्री शाहू महाविद्यालय, पाथ्री) यास ५०० रुपये व प्रमाणपत्र आणि तृतीय : जयश्री गजानन तुपे (वडोदबाजार) हिला ३०९ रुपये व प्रमाणपत्र, तर रितेश खंडागळे व मनीषा रमेश तुपे यांना उत्तेजनार्थ बक्षीस प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते देण्यात आली. या वेळी परीक्षक म्हणून डॉ. संजीवकुमार पांचाळ व डॉ. महेश थोरात यांनी काम पाहिले. यशस्वितेसाठी प्रा. विजय पांडे व सुनील पांडे यांनी परिश्रम घेतले.

बुधवार, २२ फेब्रुवारी २०१७

पुण्य नगरी

# वक्तृत्व स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांचा सहभाग



फुलंब्री/प्रतिनिधी

शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून फुलंब्रीतील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने २० फेब्रुवारी रोजी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ४० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

या स्पर्धेसाठी तालुक्यातील अन्य शाळा महाविद्यालयातील एकूण ४० स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी दिलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर अतिशय परखड व सुंदर अशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी आपआपली मते मांडली. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम- ऋषिकेश गायकवाड ऋषिकेश( श्री संत सावता गुरुकुल) यास ७०१ रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय-योगेश उत्तम गाडेकर( राजश्री शाहू महाविद्यालय, पाथ्री) यास ५०० रुपये व प्रमाणपत्र तृतीय- जयश्री गजानन तुपे( वडोदबाजार) हिस २०१ रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. रितेश खंडागळे व मनीषा रमेश तुपे या दोघांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. प्राचार्य डॉ.एस.आर. टकले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून डॉ.संजीवकुमार पांचाळ व डॉ.महेश थोरात यांनी महत्वपूर्ण जबाबदारी सांभाळली. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रा. विजय पांडे व सुनील पांडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

21 फेब्रुवारी 2017



फुलंब्री : सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना प्राचार्य डॉ. सुभाष टकले.

# शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेत ऋषिकेश गायकवाडला पहिले बक्षीस

## योगेश गाडेकर द्वितीय, जयश्री तुपे तृतीय

फुलंब्री, ता. २० (बातमीदार) : शिवजन्मोत्सवानिमित्त संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी तालुक्यातील अन्य शाळा- महाविद्यालयांतील एकूण ४० स्पर्धक सहभागी झाले. होते. 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करून शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. ऋषिकेश गायकवाड, श्री संत सावता गुरुकुल यास ७०१ रुपयांचे पहिले, योगेश गाडेकर, राजश्री शाहू महाविद्यालय, पाथ्री यास ५०१ रुपयांचे दुसरे, जयश्री तुपे, वडोदबाजार हिला २०१ रुपयांचे तिसरे, रितेश खंडागळे व मनीषा तुपे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. महेश थोरात यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. विजय पांडे, सुनील पांडे यांनी प्रयत्न केले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.